शिक्षा अंतीम करणे बाबत (श्री.अरुण गोविंद जेजूरकर, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत- अंभोरे, ता.संगमनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४२८/२०२६
दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ:- १.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२३५/२०२३, दि.२४/०३/२०२३
२.या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४७०/ २०२३,दिनांक २३/०६/२०२३.
३.सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/ सीआर १२०/२०२३,दिनांक-२८/११/२०२५ प्राप्त दिनांक ०७/०१/२०२६.
४. श्री.अरुण गोविंद जेजूरकर,यांचा सेवा विषयक तपशील दि.२५.०२.२०२६.
५.या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२३/२०२६ /२२६१८७६ दि.२५/०३/२०२६.
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/ १२९९/ २०२६, दि.१९/०६/२०२६ नुसार श्री.जेजुरकर, ग्रामपंचायत अधिकारी यांचा खुलासा दि.२३.०४.२०२६ प्राप्त दिनांक १३/०७ /२०२६.
७.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२)

संदर्भ क्रमांक १ अन्वये, श्री.अरुण गोविंद जेजूरकर,ग्रामसेवक ग्रामपंचायत- अंभोरे,ता.संगमनेर त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक २ नुसार श्री.अरुण गोविंद जेजूरकर,ग्रामसेवक ग्रामपंचायत- अंभोरे,ता.संगमनेर यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत श्री.अरुण गोविंद जेजूरकर, ग्रामसेवक ग्रामपंचायत-अंभोरे, ता. संगमनेर यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०६ दोषारोपांपैकी ०६ आरोप सिध्द झाले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.अरुण गोविंद जेजूरकर,ग्रामसेवक ग्रामपंचायत-अंभोरे,ता.संगमनेर यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ

भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल, अशारितीने दोन वर्ष थोपविणे ही शिक्षा अंतीम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास या संदर्भात आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये श्री.अरुण गोविंद जेजूरकर,ग्रामसेवक ग्रामपंचायत- अंभोरे,ता.संगमनेर त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे.

श्री.अरुण गोविंद जेजूरकर, ग्रामसेवक ग्रामपंचायत-अंभोरे,ता.संगमनेर यांचा खुलासा मान्य/ अमान्य/अंशत: मान्य करुन श्री.अरुण गोविंद जेजूरकर, तत्कालीन ग्रामसेवक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने ०२ वर्ष थोपविणे ही शिक्षा या आदेशान्वये अंतीम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202611040840292 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 15:35:39
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.अरुण गोविंद जेजूरकर, ग्रामसेवक ग्रामपंचायत-अंभोरे,ता.संगमनेर
द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,संगमनेर.
२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. कार्यासन ग्रापं-१, ग्रामपंचायत विभाग, जि.प.अहिल्यानगर.

४. निवड नस्ती